# प्रेसनोट

दिनांक ०६/०८/२०१८

**लोकसेवक स्वप्निल आप्पासाहेब साळुंके, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती कर्जत ता.कर्जत .जि.अहमदनगर यांना १,५०० रुपयांची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडले.**

प्रस्तुत बातमीतील हकिगत अशी की, तक्रारदार यांच्या पत्नीस प्रधाममंत्री आवास योजने अंतर्गत सन २०१७–२०१८ मध्ये घरकुल मंजुर झाले.सदर योजने अंतर्गत मंजुर झालेले १,२०,०००/–रू. पैकी चार हप्त्यात त्यांना एकुण १,१०,०००/– रू. वेळोवेळी मिळाले. योजने अंतर्गत दोन खोल्या व एक संडास बाथरूम पुर्ण झाल्याने शेवटचा उर्वरीत १०,०००/– चा हप्ता मिळणेसाठी ग्रामपंचायत येसवाडी ता. कर्जत कडुन घरकुल पुर्णत्वाचा अहवाल पंचायत समिती कार्यालय, कर्जत येथे जुलै २०१८ अखेर पाठविण्यात आला. सदर घरकुलातील बांधण्यात आलेले संडास हे जुने असल्याने त्याबाबत तडजोड करून शेवटचा चेक काढण्याचे कामासाठी यातील आरोपी लोकसेवक श्री. स्वप्निल आप्पासाहेब साळुंके, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता (कंत्राटी) पंचायत समिती कर्जत ता.कर्जत .जि.अहमदनगर राहणार– जुन्या पेट्रोलपंपा जवळ,बुवासाहेबनगर, नगर रोड, कर्जत जि.अ.नगर यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा दुरूपयोग करून कायदेशिर परिश्रमिका खेरीज अन्य पारितोषन म्हणुन तक्रारदार यांच्याकडे तडजोडीने १,५००/– रूपये लाचेची मागणी करून सदर लाच आज दिनांक ०६/०८/२०१८ रोजी कर्जत शहरातील ओम साई टी कॉर्नर, जुना पंचायत समिती रोड, कर्जत येथे पंच साक्षिदारासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.

सदर सापळा कारवाई अहमदनगर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग या युनिटने केली आहे.

ॲन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर कार्यालयामार्फत सर्व सामान्य जनतेला आवाहन करण्यात येते की, त्यांना कोणी शासकिय नोकर शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी करत असेल तर त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो,कार्यालय,अहमदनगर येथे पोलीस उप अधीक्षक श्री. किशोर चौधरी यांचेशी संपर्क साधावा.

| **कार्यालयाचा पत्ता** | **पोलीस उप अधीक्षक कार्यालय,जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही.सेंटरसमोर,सावेडी,अहमदनगर.** |
|---|---|
| मोबाईल नंबर | ७२७६०६१११३ |
| फोन नंबर | ०२४१–२४२३६७७. |
| टोल फ्री नंबर | १०६४ |

( किशोर चौधरी )
पोलीस उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,अहमदनगर

Scanned by CamScanner